नि.फौ.ख.क्र.५४७/२०२१

नि.३३

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ चा शपथपूर्वक जबाब**

**मी शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नाव – भिकाजी नानासाहेब शेळके,**

**वय –** ४० वर्षे, व्यवसाय– नोकरी,

**राहणार –** आडगांव खुर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर.

---

**<u>सरतपास– अभियोगपक्षातर्फे श्री. ए.पी.नागरे, प्रभारी विद्वान विशेष सहायक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे</u>**

मी सर्व आरोपींना ओळखतो. आज रोजी सर्व आरोपी न्यायालय कक्षात हजर आहेत. घटना काय घडली ते मला माहित नाही. पोलीसांनी माझा घटनेबाबत जबाब नोंदविला नव्हता. मला घटनेबाबत काहीही माहित नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तर सुचक सुचन देण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजुर करणेत आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी आरोपींनी रस्त्यावर मुरूम टाकण्याच्या कारणावरून आमच्यात किरकोळ वाद झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपींनी आम्हाला शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी सर्व आरोपींनी आम्हाला मारहाण करण्यास सुरूवात केली होती. असे काही घडले नाही की, त्यावेळी आरोपींनी काठीने मला मारहाण केली होती. असे काही घडले नाही की, त्यावेळी आरोपींनी नानासाहेब व बाळासाहेब यांना लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमची न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्रीमती एस.एस.झाडे यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास काही नाही.**

**नि.फौ.ख.क्र.५४७/२०२१**
**नि.३३**

**साक्षीदार मुक्त.**

दिनांक – ०६/०४/२०२६

माझे समक्ष

PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2026.04.06 16:48:45 +0530

(प्र. शं. गिरगांवकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), राहाता.

श्रवणोत्तर स्वीकृती

PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2026.04.06 16:48:35 +0530

(प्र. शं. गिरगांवकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), राहाता.